# गोखले इन्स्टिट्यूटमध्ये शाश्वत विकास केंद्र स्थापन

## डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन; धोरणात्मक बाबींवर संशोधन होणार

**पुणे, ता. १ :** उद्योग आणि शैक्षणिक सहकार्याचा नवा अध्याय गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेत रचला गेला असून, हवामान बदलाचा सामना करण्यासाठी शाश्वत विकास केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्‌घाटन कार्यक्रम पार पडला. या वेळी केपीआयटी टेक्नॉलॉजीचे संस्थापक डॉ. रवी पंडित आणि प्राज इंडस्ट्रीजचे संस्थापक डॉ. प्रमोद चौधरी, प्रा. माधव गाडगीळ, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. आशीष लेले, बायफचे माजी अध्यक्ष गिरीश सोहोनी, एमकेसीएलचे माजी व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत, कमिन्सचे प्रदीप भार्गव, कुलगुरू डॉ. अजित रानडे आदी उपस्थित होते.

शाश्वत विकासाची ध्येय, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि धोरणे अशा पैलूंवर हे नवे केंद्र काम करणार आहे. शाश्वत ऊर्जास्रोत, संसाधनांचा शाश्वत वापर, घनकचरा व्यवस्थापन, शेती, शहरीकरण आणि उपजीविका आदी धोरणात्मक गोष्टींवर संशोधन करण्यात येणार आहे. डॉ. पंडित म्हणाले, ''शाश्वत विकास ही आपल्या भावी पिढ्यांच्या वाढीची आणि समृद्धीची गुरुकिल्ली आहे. दीर्घकालीन टिकणारे आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांचा विचार याद्वारे केला आहे.'' डॉ. चौधरी म्हणाले, ''सर्वच प्रकारातील दळणवळणासाठी बायोमोबिलिटी सामाजिक तसेच आर्थिक दृष्टीनेदेखील महत्त्वाची भूमिका बजावेल. तसेच पुण्याजवळील एक गाव पूर्णपणे कार्बन न्यूट्रल बनविण्याचा प्रयोगही या केंद्राच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.'' केंद्रात विविध संशोधन प्रकल्प, उपक्रम, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि परिषदा आयोजित करण्यात येणार आहे.



**गोखले इन्स्टिट्यूट, आघारकर रस्ता :** सामंजस्य कराराप्रसंगी उपस्थित (डावीकडून) डॉ. अजित रानडे, डॉ. रवी पंडित, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. प्रमोद चौधरी, मिलिंद देशमुख आणि निवृत्त कर्नल कपिल जोध.

> शाश्वत विकास ही केवळ गरज नसून, मानवतेला भविष्यात पुढे जाण्याचा एकमेव मार्ग आहे. अक्षय ऊर्जेचा वापर करण्याच्या आणि त्याचबरोबर त्यामध्ये नावीन्यपूर्ण पर्याय प्रदान करण्यासाठी भारत जगाचे नेतृत्व करू शकेल.
>
> **- डॉ. रघुनाथ माशेलकर,** ज्येष्ठ शास्त्रज्ञ